प्रभात पुणे, शुक्रवार, दि. ९ ऑगस्ट २०१९ 3

ZES's Zeal College of Engineering & Research
LIBRARY
804
ZCOER
Narhe, Pune-41.




आंबेगाव : रेड हॅड जागतिक प्रमाणपत्र परीक्षेत यश संपादन केलेले झीलचे विद्यार्थी.

## झीलच्या विद्यार्थ्यांचे रेड हॅट जागतिक प्रमाणपत्र परीक्षेत यश

**आंबेगाव, दि. ८ -** झील महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी रेड हॅटच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या जागतिक दर्जाचे प्रमाणपत्र परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. सदर परीक्षा रेड हॅट या नामांकित कंपनीकडून घेण्यात आली होती. या परीक्षेत महाविद्यालयाचे दहा विद्यार्थ्यांनी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. यापैकी ६ विद्यार्थ्यांनी ३०० पैकी ३०० गुण मिळवून महाविद्यालयामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करून एक नवा आदर्श प्रस्थापित केला आहे. श्रीकृष्ण राजपुरोहित, करण चावला, ओंकार संकपाळ, जय अग्रवाल, अथर्व दवंदे, ओंकार पार्थे या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव जयेश काटकर, संस्थेचे कार्यकारी संचालक प्रा. प्रदीप खांदवे, प्राचार्य डॉ. अजित काटे व विभाग प्रमुख डॉ. योगेश गुरव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सदर विद्यार्थ्यांना प्रा. निहाल शिकलगार यांचे मार्गदर्शन लाभले.